पुणे महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे मुखपत्र

# कल्याणवार्ता

• वर्ष २ रे • अंक : १९ •एप्रिल २००९ • पृष्ठे ४

इंटरनेट आवृत्ती – www.punecorporation.org

## कलाकार मनपा सेवकातर्फे सामाजिक प्रबोधन

मे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णय आणि घन कचरा व्यवस्थापन नियम २००० नुसार नागरिकांनी निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे ओला आणि सुका



असे वर्गिकरण करुन ओला कचरा उगमाच्या ठिकाणी जिरवावा, असे बंधन घालण्यात आलेले आहे. शहरातील कचरा गोळा करणे, त्याची वाहतुक करुन विल्हेवाट लावणे हे बंधनकारक कर्तव्य संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांची आहे. या प्रक्रियेत नागरिकांचा सहभाग वाढविल्यास कचरा निर्मूलन परिणामकारकरित्या करणे स्थानिक स्वराज्य संस्थांना सहज शक्य होईल. या कामी नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर प्रबोधन व जागृती करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी श्रमिक कला पथकाने पथनाट्याद्वारे नागरिकांचे प्रबोधन व जागृती करण्याचा अनोखा उपक्रम सुरु केला आहे. या पथकातील प्रमुख सदस्य श्री. महादेव जीवराज जाधव, बिगारी यांचे हे मनोगत.

आई वडिलांच्या वारकरी संप्रदायाच्या वारशामुळे बालपणी गायनाचे वेड लागलेला, १९७२ च्या दुष्काळाची झळ बसलेला, बालपणापासून अर्थार्जनासाठी कष्ट करणाऱ्या श्री. जाधव यांनी रात्र प्रशालेमधून शिक्षण पूर्ण केले. त्यांची दिनांक ५/५/१९९४ रोजी महापालिकेत बिगारी या हुद्यावर नेमणूक झाली. सुरुवातीस पौड रोड कचरा डेपो येथे आणि २००३ पासून उरुळी देवाची कचरा डेपो येथे कामास असलेल्या श्री. जाधव यांनी डेपोमध्ये सुधारणा करण्याबरोबरच आग लागू नये म्हणून विशेष प्रयत्न केले. कर्मचाऱ्यांमधील सहकार्याची भावना वाढीस लावणेसाठी त्यांच्यामधील सुप्त कलागुणांना वाव देणे आवश्यक ठरते, श्री. जाधव आपल्या गायनाने सहकाऱ्यांचीदुखे समजून घेत त्यावर फुंकर घालत त्यांना प्रोत्साहन देण्याचे महत्वाचे काम करतात. अतिशय गरीबी व हलाखीमध्ये जीवन जगलेले श्री. जाधव यांनी आपल्या मुलांना उच्च शिक्षित केले आहे. एक मुलगी वकिल तर दुसरी मुलगी शिक्षिका म्हणून कार्यरत आहे. तसेच, सफाई कामगारांच्या मुलांनी उच्चशिक्षित होवून स्वत:ची श्रेणीवाढ करुन समाजासाठी चांगले काम करावे ही इच्छा मनाशी ठेवून त्यांनी मुलांना उच्च शिक्षण दिले. तसेच, विविध विषयांवर विविध चालींमधील कविता करुन सादर करणे हा त्यांचा छंद त्यांनी काम करीत असताना जोपासला आणि त्यामुळे ते सर्व कामगार वर्गामध्ये शीघ्रकवी म्हणून परिचित आहेत.

सन २००३ साली मा. श्रीमती मुक्ता मनोहर यांची जीवनकहानी ऐकून श्री. जाधव यांच्यातील कवित्व अधिक प्रगल्भ झाले. तेंव्हापासून श्री. जाधव कामगारांच्या जीवनावर गाणी रचून सादर करु लागले. मा. नंदकिशोर जगताप, सल्लागार (कामगार) यांच्या मार्गदर्शनाखाली कलापथकास अधिक प्रोत्साहन मिळून प्रबोधनपर कार्यक्रम सादर करण्यामध्ये श्री. जाधव यांचा सिंहाचा वाटा आहे. यामध्ये भीमराव व उत्तम बनसोडे, नागनाथ गायकवाड, सचिन कदम, अरुण शेंडगे, या कलापथकामध्ये कार्यरत असणाऱ्या सहकाऱ्यांचा ते कृतज्ञतापूर्वक आदराने व आवर्जून उल्लेख करतात. सार्वजनिक गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, विविध जयंत्या, उत्सव, प्रभाग, इत्यादीमध्ये पथनाट्याद्वारे नागरिकांचे प्रबोधन करण्याचे महत्वाचे कार्य कलापथकातील सदस्य करीत आहेत. त्या कलापथकातील हा कचऱ्यातील हिरा सातत्याने आपल्या शीघ्र कविताद्वारे प्रकाशित होत आहे.

पुणे शहरात निर्माण होणारा कचरा निर्मूलन करणेकामी नागरिकांचे कर्तव्य, ओला सुका कचरा वर्गिकरणाचे महत्व, इत्यादी बाबत पुणे मनपा कलापथकाद्वारे नागरिक आणि सामाजिक जनजागरणाच्या प्रबोधन मोहिमेची पताका खांद्यावर घेवून हा कचऱ्यातील हिरा तसेच एका प्रतिथयश वकिलाचा वडिल आणि सर्वार्थाने वारकरी असलेला हा हरहुन्नरी कामगार आपल्या परीने मार्गक्रमन करत आहे. त्याच्या पाठीशी आपण सर्वांनी सक्रीय होवून उभे रहाणे ही काळाची गरज आहे.

## कर आकारणी व संकलन विभागाकडील अधिकारी/सेवकांचा सन्मान




कर आकारणी व कर संकलन कार्यालयाने सन २००८-०९ या आर्थिक वर्षात सुमारे १०० कोटीने अधिक उत्पन्न जमा केल्याने कर आकारणी व कर संकलन कार्यालयाकडील अधिकारी/सेवकांचा सन्मान पीएमसी एम्प्लॉईज युनियन यांचे वतीने दि.१७/४/०९ रोजी सायंकाळी ६ वाजता श्रमिक भवन, शिवाजीनगर येथे करण्यात आला. या समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून मा.प्रवीणसिंह परदेशी, महापालिका आयुक्त, अध्यक्ष म्हणून मा. एम.एस.देवणीकर, अति.महा.आयुक्त (ज) उपस्थित होते. याशिवाय मा. प्रशांत वाघमारे, नगर अभियंता, मा.विलास कानडे, उप आयुक्त तथा कर आकारणी कर संकलन प्रमुख, मा. प्रमोद निरभवणे, विकास अभियंता (पाणी पुरवठा), मा. ज्ञानेश्वर मोळक, उप आयुक्त (वि.का.क्र.२) तसेच क्षेत्रीय अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, कामगार कल्याण अधिकारी यांचेसह अनेक महापालिका सेवक उपस्थित होते. याशिवाय श्रीमती मुक्ता मनोहर, सरचिटणीस, पुणे मनपा कामगार युनियन आणि दोन्ही कामगार संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा. पांडुरंग सावंत, जनरल सेक्रेटरी, पीएमसी एम्प्लॉईज यांनी केले. प्रास्ताविकामध्ये या कार्यक्रम आयोजनामागील उद्देश स्पष्ट करताना महापालिकेचे अधिकारी आणि सेवक सातत्याने उत्पन्न वाढीसाठी अविरत प्रयत्नशील असतात. कर संकलन विभागाने केलेल्या विक्रमी कर वसुलीप्रित्यर्थ त्यांना प्रोत्साहन देणेसाठी हा कार्यक्रम आयोजित केल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच,२% मुशाहिरा देणेबाबत प्रशासनाने विचार करावा अशी मागणी श्री.सावंत यांनी या वेळी केली.

या कार्यक्रमाचे सुरुवातीस कर आकारणी कर संकलन विभागाकडील अधिकाऱ्यांसह अनेक मान्यवरांनी आपली मनोगते व्यक्त केली. सुरुवातीस विभागीय निरीक्षक श्री. प्रताप पठारे यांनी मिळकत कर आकारणी व संकलनासाठी तयार करण्यात आलेल्या नियोजनबद्ध कार्यक्रमानुसार आणि कृती आराखड्यानुसार कार्यवाही करण्यात आल्याने हे यश संपादन करणे शक्य झाले. याशिवाय मा. महापालिका आयुक्त व इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी केलेले मोलाचे मार्गदर्शन अधिक प्रेरणादायी ठरले.

तदनंतर सहाय्यक कर आकारणी कर संकलन प्रमुख श्री. दयानंद सोनकांबळे यांनी कर आकारणी कर संकलन प्रमुख यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आलेल्या नियोजनामध्ये ठरवून दिलेल्या एमआयएस पध्दतीनुसार कार्यवाही केल्याने मिळकतकर वसुली परिणामकारकरित्या झाली. तसेच, सर्व क्षेत्रीय कार्यालयनिहाय वसुलीचे उद्दिष्ट देवून क्षेत्रीय कार्यालय व मुख्य कार्यालय यांचा समन्वय साधल्याने कर वसुली मागील वर्षापेक्षा जास्त करण्यात आली. यामध्ये बांधकाम विभागाकडून पूर्णत्वाचे दाखले मिळणेकामी झालेले सहकार्य, मिळकतदारांनी केलेले अर्ज आणि कार्यालयामार्फत राबविण्यात आलेल्या अभय योजनेचा मोठ्या प्रमाणावर सकारात्मक परिणाम झाल्याचे श्री. सोनकांबळे यांनी मनोगतात व्यक्त केले.

तदनंतर उप आयुक्त तथा कर आकारणी कर संकलन प्रमुख मा. विलास कानडे यांनी आपल्या मनोगतामध्ये कर विभागामध्ये असलेल्या उणीवा आणि अपुरी साधनसामग्री यांचा विचार करुन मिळकतकर वसुलीचा कालबध्द कार्यक्रम सुरुवातीस निश्चित केला. तसेच, प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयनिहाय एमआयएस पध्दतीने दरमहा आढावा घेवून केलेले प्रयत्न, मिळकतदारांना विहित मुदतीत पाठविलेली देयके, सर्व निरीक्षक व कर्मचाऱ्यांना विश्वासात घेवून विशेष वसुली मोहिम राबविल्याने विक्रमी मिळकतकर वसुली झाल्याचे नमूद केले. याशिवाय शासकीय अनुदाने मिळविण्यासाठी केलेला सातत्याने पाठपुरावा, केंद्र व राज्य सरकारकडील मिळकतकराची थकबाकी वसुली आणि क्षेत्रीय कार्यालय आणि कर विभागाकडील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी केलेले सांघिक प्रयत्न यामुळे विक्रमी मिळकतकर वसुल झाला, असे त्यांनी मनोगतात नमूद केले. याशिवाय बांधकाम विभागाकडील पूर्णत्वाचे दाखले, अभय योजना, इत्यादीद्वारे ४८००० मिळकतींची कर आकारणी करुन रु. ८२ कोटीची वार्षिक करपात्र रकमेची नव्याने भर घालण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. तसेच, मा. महापालिका आयुक्त व मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) यांनी दिलेल्या उपयुक्त मार्गदर्शनामुळे आणि मुलभूत सोयीसुविधांमुळे कर वसुलीची मोहिम अधिक तीव्र गतीने राबविता आली तसेच, या सर्व यशाचे श्रेय सांघिक प्रयत्नास आहे, असे मा. कानडे यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमात तदनंतर मा.प्रवीणसिंह परदेशी, महापालिका आयुक्त यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. आपल्या मार्गदर्शनामध्ये कर आकारणी कर संकलन प्रमुख आणि त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व सेवक नियोजनबध्द, पारदर्शीपणे काम करत असल्याचे त्यांनी सुरुवातीस सांगितले. तसेच, इतर विभागांपेक्षा कर आकारणी कर संकलन विभागाच्या कामकाजामध्ये तुलनेने कमी लक्ष घालावे लागले, असे मा. परदेशी यांनी नमूद केले. तसेच, संगणक, ईमेल, इत्यादीद्वारे नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण करुन त्याबाबत योग्य तो अहवाल कर विभागाकडून खात्रीशीर प्राप्त होत असे, ही बाब मा. महापालिका आयुक्त यांनी सांगितली. मिळकतकर आकारणी व संकलन खात्याने अनेक धोरणात्मक निर्णय घेवून शहरातील सुमारे ४ लाख मिळकतींचे सर्वेक्षण करुन जीआयएस कामाची कार्यवाही सुरु केली. त्याबद्दल मा. परदेशी यांनी विशेष कौतुक केले. तसेच, १०० कोटीची विक्रमी वसुली केल्याबद्दल त्यांनी खातेप्रमुख, उप खातेप्रमुख व खात्यातील सर्व सेवकांचे विशेष अभिनंदन आपल्या मार्गदर्शनामध्ये केले. शेवटी मा. एम.एस.देवणीकर, अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यामध्ये मंदीच्या काळातही कर आकारणी व कर संकलन विभागाने १०० कोटीची विक्रमी वसुली केल्याबद्दल त्यांचे विशेष अभिनंदन केले. तसेच, या विभागाने कृती आराखड्यानुसार आणि नियोजनपध्दतीने राबविलेल्या कर वसुली कार्यक्रमाचे कौतुक करुन आयातकराचे उत्पन्न कमी होत असताना मिळकतकराचे उत्पन्न वाढले ही एक स्पृहनीय बाब असल्याचे त्यांनी मनोगतामध्ये नमूद केले. तसेच, पीएमसी एम्प्लॉईज युनियनने आयोजित केलेल्या या आगळ्यावेगळ्या सन्मान सोहळ्याचे त्यांनी कौतुक केले. तसेच, कामगारांना कामगार संघटनेकडून यापुढेही अशाच प्रकारचे प्रोत्साहन मिळत राहील, अशी आशा त्यांनी आपल्या मार्गदर्शनामध्ये व्यक्त केली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मा. तुकाराम जगताप, अध्यक्ष, पीएमसी एम्प्लॉईज युनियन यांनी केले व आभार श्री. पोपट गवळी, कार्याध्यक्ष यांनी मानले व कार्यक्रम संपन्न झाला.

## संपादकीय...

# नियोजन

प्रत्येक संस्थेत प्रशासकीय यंत्रणा हा अविभाज्य भाग आहे. संस्थेच्या स्थापनेपूर्वी उद्दिष्ट निश्चित झालेले असते. उद्दिष्टपूर्तीसाठी प्रशासकीय यंत्रणा राबत असते. त्यासाठी प्रशासकीय यंत्रणा कार्यरत करणे ही पूर्व नियोजनाची कौशल्यपूर्ण कामगिरी आहे. नियोजनामध्ये जागा, भांडवल, मनुष्यबळ, कालमर्यादा, सामाजिक व नियोजनावर प्रभाव टाकणारे अन्य घटक यांचा एकत्रपणे अष्टावधानी राहून सुंदर मिलाप करणे यास पूर्व नियोजन म्हणतात. पूर्व नियोजनात मुलभूत कार्याबरोबर संघटन, नियंत्रण व उत्कृष्ट पर्यवेक्षण अत्यंत महत्वाची व प्रभावी भूमिका बजावतात. कवि किपलिंग यांचे मते मी अत्यंत प्रामाणिक ६ कार्यकर्ते सतत बरोबर ठेवतो. त्यांची नावे काय, कशासाठी, केंव्हा, कसे, कोठे व कोण अशी आहेत. नियोजनाची प्रक्रिया मुलभूत स्तरावरुन सुरु होते. यामध्ये उपलब्ध साधनसामग्री, मनुष्यबळ, पैसा, वेळ व अन्य प्रभावी घटक यांचा समन्वय साधून कृती आराखडा तयार करणे हे कौशल्यपूर्ण काम प्राथमिक स्तरावर करणे अपरिहार्य असते. कारण पूर्वनियोजन ही दीपस्तंभासारखी खंबीर, स्फूर्तीदायी व मार्गदर्शन करणारी क्रिया आहे.

या क्षेत्रातील मान्यवर विचारवंत श्री. जॉर्ज टेरी यांचे मते पूर्वनियोजनावर प्रभाव पाडणाऱ्या घटकांची सुयोग्य निवड करुन त्यांचा योग्य वेळी, योग्य ठिकाणी उपयोग करुन आपले इच्छित उद्दिष्ट साध्य करणे यासाठी दूरदृष्टीने आखणी करणे आवश्यक आहे. पूर्वनियोजन करण्यासाठी मुलभूत व प्राथमिक स्तरावर प्रकल्पाशी संबंधित सर्व बाबी व प्रभावी घटक यांचा चौफेर व सखोल विचार करुन प्रक्रिया पूर्ण करणे नितांत गरजेचे असते. नियोजन म्हणजे कार्यपूर्तीची पूर्वतयारी होय. यामध्ये नियोजित उद्दिष्ट, कार्यपध्दती, उपलब्ध साधनसामग्री, अर्थ, मनुष्यबळ व कालावधी या सर्वांचा पर्याप्त व योग्य वापर करणे होय. त्या अनुषंगाने कृती आराखड्यानुरुप यंत्रणा उभी करणे यास पूर्वनियोजन म्हणतात. त्यामध्ये भविष्यकालीन तरतुदीचा समावेश करणे, त्याप्रमाणे कार्यप्रवृत होणे, पूर्व नियोजनाप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचे सिंहावलोकन करुन आढावा घेणे अपेक्षित आहे. संस्थेचे उद्दिष्टपूर्तीसाठी पुढील घटकांच्या अनुषंगाने नियोजन करावे लागते. यामध्ये उत्पादन, खरेदी विक्री, वित्तीय व्यवस्थापन, विविध सेवा व नव्याने रुजलेली माहिती तंत्रज्ञान प्रणाली अशा विविध क्षेत्रामधील घटक संस्थांचा विचार करता त्या क्षेत्राशी संबंधित सर्व मुलभूत गोष्टी व प्रभावी घटक यांचा विचार करताना संस्था, शासकीय, निमशासकीय, सार्वजनिक वा खाजगी यामधील कोणत्या क्षेत्रातील आहेत त्याचबरोबर त्या क्षेत्रातील त्या संस्थेची कार्यपध्दती कशी आहे, प्रस्तावित संस्थेकडे उपलब्ध मुलभूत बाबी आणि त्यावर प्रभाव टाकणारे घटक यांचा वास्तवाने विचार करणे आवश्यक आहे. जसे स्थानिक स्वराज्य संस्था स्थानिक रहिवाशांना त्यांच्या गरजेनुसार वेळेवर उच्च दर्जाच्या नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी स्थापन केल्या आहेत. त्यांचेकडे उपलब्ध असणारी साधन सामग्री, अर्थ आणि मनुष्यबळ आणि कालावधी त्याचबरोबर स्थानिक स्तरावरील प्रभावी घटक यांचा एकत्रित विचार करुन प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेने नियोजन करणे अपरिहार्य ठरते. त्यास अनुरुप पूर्वनियोजन करणे अपरिहार्य ठरते.

तथापि, या महत्वपूर्ण आणि अनिवार्य प्रक्रियेमध्ये काही घटकांना अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. यामध्ये व्यवस्थापन आणि प्रशासकाचा सहभाग महत्वाचा असल्याने व्यवस्थापनाने पुढाकार घेवून कृती आराखडा तयार करणे आवश्यक आहे. कारण ज्या संघटनेमध्ये व्यवस्थापन उदासिन आहे तेथे नियोजन परिणामकारक होत नाही. तसेच, नियोजन करण्यापूर्वी व्यवहारिक पातळीवर एकूणच परिणाम करणाऱ्या प्रभावी घटकांचे उपद्रव मूल्य, मर्यादा व त्याचे विपरित परिणाम लक्षात घेवून त्या घटकांना प्रतिबंधित करणे अत्यंत अवघड काम कुशलतेने करावे लागते. कारण करण्यात येणाऱ्या नियोजनाचा उद्देश, संस्थेची ध्येयधोरणे, प्रकल्प खर्च, प्रत्येक टप्प्यावर येणाऱ्या अडचणी, त्यावर करावयाची उपाययोजना, मनुष्यबळाचा पर्याप्त वापर, इत्यादी घटक नियोजनाच्या पातळीवर परिणाम करत असतात. त्यामुळे कोणत्याही नियोजन प्रक्रियेमध्ये या घटकांना अनन्यसाधारण महत्व असून, नियोजन करताना यांचा साकल्याने विचार करणे अनिवार्य ठरत आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये भविष्यकाळात होणारे बदल विचारात घेवून दीर्घकालीन नियोजन अनिवार्य ठरते. यामध्ये लोकसंख्येत होणारी वाढ विचारात घेवून पाणीपुरवठा, मलनि:सारण,पथ, कचरा निर्मूलन व पथावरील प्रकाश योजना, इत्यादी प्रकल्पासाठी पुढील किमान २५-५० वर्षासाठी नियोजन आवश्यक आहे. यामध्ये दरवर्षी अंदाजपत्रकीय तरतुद, साधनसामग्री व कुशल मनुष्यबळाची उपलब्धता, येणाऱ्या अडचणी आणि त्यावरील उपाययोजना, प्रकल्प विहित वेळेत पूर्ण करणेसाठीचा कृती आराखडा, प्रकल्पावर होणारा खर्च आणि त्यापासून मिळणाऱ्या सेवा या सर्व बाबींचे एकत्रित व साकल्याने विचार करुन प्रकल्पाचे नियोजन करणे आवश्यक ठरते. त्यामध्ये उपलब्ध साधनसंपत्ती व मनुष्यबळ यांचा पर्याप्त वापर करणे आवश्यक ठरते. उदा. नियोजनानुसार झालेल्या कामाचा आढावा घेवून पुढील कामासाठी कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन देणे, अत्याधुनिक साधनसमाग्री उपलब्ध करुन देणे, इत्यादी बाबींचा अवलंब केल्यास सर्व घटकांचा पर्याप्त वापर होवून विहित मुदतीत प्रकल्प पूर्ण करणे शक्य होते. थोडक्यात उपलब्ध साधनसामग्री आणि मनुष्यबळ यांची योग्य सांगड घालून भविष्यकालीन अडचणी विचारात घेवून केलेले कार्यात्मक नियोजन प्रत्येक संस्था आणि संघटनेस निश्चितपणे उपयुक्त ठरत असल्याचे दिसून येत आहे.

प्रत्येक संस्थेमध्ये उद्दिष्टपूर्ती करताना सर्वसमावेशक नियोजन करावे लागते. त्यामध्ये खाजगी संस्थांमध्ये उत्पादन, साधनसामग्री, खरेदीविक्री, वित्तीय व्यवस्थापन, इत्यादींच्या अनुषंगाने नियोजन करावे लागते. तथापि, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सामान्य जनतेला तत्परतेने, मुलभूत नागरी सुविधा उपलब्ध करुन देताना उपलब्ध साधनसामग्री, मनुष्यबळ आणि तदनुषंगिक बाबींच्या अनुषंगाने योग्य ते नियोजन करणे. नियोजनाशिवाय कोणतीही कृती परिणामकारक होत नाही. नियोजनामुळे संस्थेच्या एकूण कारभारात पारदर्शकता येवून, संस्थेची कार्यक्षमता वाढते. नियोजनाचे सामाजिक, आर्थिक, प्रशासकीय आणि कार्यात्मक नियोजन असे विविध पैलू आहेत. संस्थेच्या ध्येयपूर्तीसाठी तयार करण्यात आलेल्या कृती आराखड्यामध्ये भविष्यकालीन अडचणींवर मात करणेसाठी उपाययोजना निहित असते. पूर्व नियोजनामुळे होणाऱ्या परिणामांची चिंता वाटत नाही. कारण त्यासाठी पूर्वतयारी करुन ठेवण्यात आलेली असते. कार्यक्रमांची रितसर मांडणी केल्याने अनुत्पादक खर्च कमी होतात. याशिवाय व्यवस्थापन आणि कर्मचारी यांचेमध्ये सौहार्दपूर्ण वातावरण निर्माण होवून संस्थेतील एकसंघपणा वाढीस लागून प्रगतीस चालना मिळते. एकूणच संख्यात्मक ऐवजी गुणात्मक प्रगती झाल्याचे आढळून येते.

## ओळख कार्यक्षम अधिकाऱ्याची

ग्रामीण भागात जन्मलेले, अतिशय प्रतिकुल परिस्थितीत उच्च शिक्षण घेवून लघुलेखक ते उपायुक्त या पदांवर उत्कृष्ट कार्यक्षमतेमुळे बढती मिळविलेले उप आयुक्त तथा कर आकारणी कर संकलन प्रमुख विलास कानडे यांच्या कारकिर्दीचा त्यांच्या शब्दात घेतलेला धावता वेध -

विलास कानडे यांचा जन्म राजगुरुनगर तालुक्यातील गोलेगांव या अत्यंत दुर्गम व मागासलेल्या खेड्यात झाला. या गावात दहावी पास होणे हे फार मोठे यश व कौतुकाची गोष्ट ठरत असे. कारण गावात केवळ इयत्ता चौथीपर्यंतच शाळा होती. त्यानंतर सातवीपर्यंत गावापासून सुमारे ३ ते ४ कि.मी. तर आठवी ते दहावी इयत्तेच्या शिक्षणासाठी गावापासून कोणत्याही साधना शिवाय सुमारे १० ते १२ कि.मी. इतक्या अंतरावर दररोज जाणे येणे तर पावसाळ्यात सुमारे ५ ते ६ महिने होडीद्वारे नदीचा प्रवास अशा खडतर प्रतिकुल परिस्थितीत शिक्षण पूर्ण करावे लागले. तसेच, या कालावधीत शाळेचा कालावधी हा सकाळी ७ ते सायंकाळी ८ म्हणजेच ५ तासाच्या शाळेसाठी रोज किमान १३ तास द्यावे लागत होते. यावरुन शाळा शिकण्यासाठी किती कष्ट घ्यावे लागले याची कल्पना येते. या सर्वांमागे जिद्द व चिकाटीने प्रतिकुल परिस्थितीतदेखील दहावी पर्यंतचे शिक्षण दृढ निश्चय करुन पूर्ण केले. त्यामुळे पुढील शैक्षणिक वाटचालीचा भक्कम पाया रोवला गेला. त्याद्वारे महत्वाकांक्षेने जगण्याची नवीन जिद्द निर्माण झाल्याचे श्री. कानडे आवर्जुन नमूद करतात. त्यानंतर मात्र श्री. कानडे यांनी कमवा व शिका या पध्दतीने दुहेरी जबाबदाऱ्या सांभाळत बी.ए., एल.एल.बी.,एम.एल.एल.आणि एल.डब्ल्यू., डी.टी.एल.,डी.आय.टी., एल.एस.जी.डी.अशा विविध क्षेत्रातील पदवी व पदविका यशस्वीपणे मिळविल्या. येथेच त्यांनी पूर्वीच्या भक्कम पायावर उत्कृष्ट कर्तृत्वाची इमारत उभी केली.

माणसाच्या जीवनामध्ये संधी ही एकदाच येते. त्याचे सोने करणे हे प्रत्येकाच्या हातात असते. या बाबींचा सखोल परिणाम जीवनामध्ये चांगला निर्माण झालेला असल्यामुळे प्रत्येक वेळेला मिळालेल्या संधीचे सोने करण्याचा त्यांनी सातत्याने यशस्वी प्रयत्न केल्याने प्रगती होवू शकली. या संपूर्ण खडतर जीवनामध्ये आईवडिल तसेच माझ्या पत्नीचे खूप पाठबळ मिळाले ही बाब ते या ठिकाणी नम्रपणे व आग्रहाने नमूद करतात.

सद्यस्थितीत उप आयुक्त तथा कर आकारणी कर संकलन प्रमुख म्हणून श्री. कानडे कार्यरत आहेत. या विभागाच्या कामाबाबत विचार मांडताना ते खालील प्रमुख बाबी नमूद करतात.

माहे एप्रिल, २००८ पासून कर आकारणी कर संकलन कार्यालयाकडील उत्पन्नवाढीसाठी मिळकतदारांसाठी महापालिकेने अभय योजना जाहीर केली. सन २००८-०९ साठी मा. मुख्य सभेने दिलेले उद्दिष्ट पूर्ण करणेसाठी विशेष पथकांच्या नेमणूका करुन त्यांचेमार्फत थकबाकी मोहिम राबविली. दर गुरुवाली टॅक्स अदालत, एम.आय.एस. सुरु केल्यामुळे जास्तीत जास्त वार्षिक करपात्र रक्कम निर्मिती, नागरिकांच्या आलेल्या तक्रारींचे निराकरण किमान वेळेत करणे, तसेच मिळकतधारक करदाते नागरिक यांच्या मिळकत कराविषयी आलेल्या विविध ई मेल्सना उत्तरे, त्यांच्या मिळतकराविषयीच्या विविध समस्यांचे



निराकरण करणे शक्य झाल्याचे श्री. कानडे सांगतात. तसेच, सन २००७-०८ मधील पूर्ण वर्षाचे मिळकतकरापोटी मिळालेले उत्पन्न रु. २६२ कोटी वसूल झाला होता. तथापि, चालू वर्षी म्हणजेच सन २००८-०९ या आर्थिक वर्षात खात्यामार्फत राबविण्यात आलेल्या विविध उपाययोजना व थकबाकी व चालू मागणीच्या वसुली क्षेत्रीय कार्यालयाकडील सेवकांबरोबरच मुख्य कार्यालयातील सर्व विभागीय व पेठ निरीक्षक यांना वसुली उद्दिष्ट निश्चित करुन दिल्यामुळे रु. ३६२.०२ कोटी मिळकतकर जमा करण्यात यश आले आहे. तसेच,

**संवादक : शिवाजी दौंडकर**
**कामगार कल्याणाधिकारी**

यापूर्वी एका आर्थिक वर्षातील वार्षिक करपात्र रकमेपेक्षा सुमारे रु. ८० कोटी इतकी वार्षिक करपात्र रक्कम या वर्षात निर्माण करण्यात आल्याची बाब स्पष्ट करतात. याशिवाय संस्थेमार्फत करण्यात येणारी कामे नागरिकांपर्यंत पोचविणेसाठी नागरिकांचा सहभाग वाढविण्याची गरज आहे ही बाब लक्षात घेवून संपूर्ण वर्षात ३००० संगणकीय तक्रारींची ई मेलद्वारे योग्य प्रकारे सोडवणूक केल्यामुळे नागरिकांचा खात्याच्या कामकाजावर विश्वास दृढ होण्यास मदत झाली, असे खास नम्रपणे स्पष्ट करतात.

त्याचप्रमाणे सन २००९-१० या आर्थिक वर्षातील मिळकतकराची थकबाकी नसलेल्या बिलांची छपाई माहे ३१ मार्च पूर्वी करण्यात येवून त्यांचे वाटपही मिळकतदारांना सुरु करण्यात आले आहे. तसेच, दिनांक १५ एप्रिल, २००९ रोजी बहुतांशी सर्व बिलांची छपाई होवून त्याचे लवकरात लवकर वाटप करण्यात येणार आहे. याप्रमाणे केलेल्या सर्व उल्लेखनीय कामाचा परिपाक म्हणून डिसेंबर, २००८ मध्ये रोटरी क्लब ऑफ पुणे यांचेतर्फे देखील महानगरपालिकेतील चांगल्या प्रशासकीय सेवेची नोंद घेवून शहरातील प्रतिष्ठित पाच व्यक्तींमध्ये श्री. कानडे यांचा विशेष सत्कार करण्यात आलेला आहे. सन ०७-०८ मधील उत्पन्नापेक्षा सन ०८-०९ या आर्थिक वर्षाच्या उत्पन्नात सुमारे रु. १०० कोटीने अधिक झाल्याने तसेच मागील कोणत्याही एका आर्थिक वर्षातील वार्षिक करपात्र रकमेपेक्षा जास्त म्हणजेच सुमारे रक्कम रु. ८० कोटी इतकीवार्षिक करपात्र रक्कम निर्माण करण्यात आल्याने महानगरपालिका कामगार युनियनतर्फेही शुक्रवार दिनांक १७/४/०९ रोजी खातेप्रमुख, खात्याकडील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा खास सत्कार केला आहे.

आयातकर अधिक्षक या पदावर कार्यरत असताना श्री. कानडे यांच्याकडे गस्ती पथकाच्या कामकाजावर नियंत्रण व देखरेख, गस्ती पथकास उद्दिष्ट निश्चित करुन देवून जकातचोरीस आळा घालणेसाठी रात्रपाळीत विशेष पथकांच्या नेमणूका करुन आयातकर उत्पन्नवाढीची जबाबदारी सोपविण्यात आली होती. ही जबाबदारी समर्थपणे पेलताना श्री. कानडे यांनी अनेक नाक्यांवर समक्ष भेटी देवून कामात कार्यक्षमता व पारदर्शीपणा आणण्याचा प्रामाणिक प्रयत्न केल्याचे ते नमूद करतात.

क्षेत्रीय अधिकारी या पदावर कामकाज करीत असताना क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील सर्व अधिकारी/सेवकांवर व कामकाजावर नियंत्रण ठेवून क्षेत्रीय कार्यालयास दिलेले उद्दिष्ट पूर्ण करण्याचा काटेकोरपणे प्रयत्न केल्याचे ते या ठिकाणी सांगतात. तसेच, उप आयुक्त तथा क्षेत्रीय आयुक्त (विभागीय कार्यालय) या पदाचे कामकाज स्विकारल्यानंतर धनकवडी, बिबवेवाडी, सहकारनगर व टिळकरोड या नियंत्रणाखालील क्षेत्रीय कार्यालयाकडील कामकाज करीत असताना सन २०००-०१ रस्तारुंदीकरण, कात्रज रॅम्प उभारणी व कचरा हस्तांतरण केंद्राचे बांधकाम या उल्लेखनीय बाबी व त्यामुळे वार्षिक सुमारे ३४ लाख रुपयांचे इंधन व तत्सम बचत होवू शकली ही विशेष बाब असल्याचे ते नमूद करतात. तसेच, स्वच्छतेसाठी देण्यात येणारा संत गाडगेबाबा स्वच्छता अभियानांतर्गत पुरस्कार त्यांचे नियंत्रणाखालील क्षेत्रीय कार्यालयास प्राप्त झाल्याचे तसेच विधानसभा तारांकित प्रश्न, महापालिका सार्वत्रिक निवडणूकीमध्ये टपाली मतपत्रिका वितरणाचे कामकाज यशस्वीरित्या पूर्ण केल्याचे श्री. कानडे खास अभिमानाने सांगतात.

मनपा अधिकारी/कर्मचारी यांनी कार्यालयीन काम करीत असताना आपणास नेमून दिलेले कर्तव्य हे नागरिकांच्या प्रती असून नागरिकांसाठी आपण काम करीत आहोत. नागरिक आपल्यासाठी नाहीत, तर आपण व आपली संस्था नागरिकांसाठी आहे, ही भावना त्यांच्या मनात रुजली पाहिजे. ही भावना अंगीकारल्यास बहुतांशी नागरिकांच्या समस्यांची/कामाची सोडवणूक चांगल्या पध्दतीने झाल्याशिवाय राहत नाही, असे नमूद करुन प्रत्येक सेवकाने आपल्यावर सोपविलेली जबाबदारी व कर्तव्यामध्ये कार्यतत्पर असणे आवश्यक आहे, अशी आशा ते व्यक्त करतात. कर आकारणी व कर संकलन विभागाने केलेल्या या अतुलनीय कामगिरीप्रित्यर्थ कामगार कल्याण निधीतर्फे त्यांचे खास हार्दिक अभिनंदन व त्यांच्या या उत्तुंग गरुड भरारीस सलाम.

## माहे मार्च, २००९ सेवापूर्ती समारंभ संपन्न

दिनांक ३१/३/२००९ रोजी कॅ. वडके सभागृह येथे माहे मार्च, २००९ मध्ये सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/



सेवकांसाठी सेवापूर्ती समारंभ आयोजित केला होता. यामध्ये २४ वयोपरत्वे व ७ ऐच्छिक सेवानिवृत्ती घेतलेल्या अधिकारी/सेवकांचा सत्कार करण्यात आला. या सेवापूर्ती समारंभासाठी प्रमुख पाहुणे डॉ. आर.आर.परदेशी, प्र.आरोग्य प्रमुख , मा. अॅड. बोंबले देशमुख, पुणे मनपा कामगार युनियनचे विधी सल्लागार, मा. नंदकिशोर जगताप, सल्लागार (कामगार), श्री. तुकाराम जगताप, अध्यक्ष, पुणे मनपा एम्प्लॉईज युनियन, श्री. प्रकाश जाधव, कार्याध्यक्ष, पुणे मनपा कामगार युनियन, श्री. अरुण खिलारी, कामगार कल्याणाधिकारी, श्री. जयंत पवार, व्यवस्थापक, मामाराव दाते मुद्रणालय हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुरुवातीस प्रमुख पाहुण्यांचा पुष्पगुच्छ देवून मा. नंदकिशोर जगताप यांनी स्वागत केले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकामध्ये मा. नंदकिशोर जगताप, सल्लागार (कामगार) यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सेवापूर्ती समारंभ आयोजित करण्यामागची भूमिका विषद केली. यामध्ये सेवानिवृत्त होणाऱ्या सर्व सेवकांचा एकाच व्यासपीठावर सन्मान करुन त्यांच्या सेवानिवृत्तीचे आर्थिक लाभ त्यांना विहित मुदतीत देणे हा उद्देश असल्याचे त्यांनी प्रास्ताविकात नमूद केले. याशिवाय महापालिका प्रशासनाने नागरिकांचा सहभाग ही संकल्पना मोठ्या प्रमाणावर राबविण्यास सुरुवात केली आहे. आजपर्यंत केलेल्या प्रदीर्घ सेवेचा लाभ महापालिका प्रशासनास देणेकामी या संकल्पनेद्वारे महापालिकेस सहकार्य करावे, अशी आशा मा. जगताप यांनी या प्रसंगी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. आर.आर.परदेशी, प्रभारी आरोग्य प्रमुख यांनी आपल्या मार्गदर्शनामध्ये सल्लागार (कामगार) कार्यालयाने सुरु केलेल्या या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक केले. विशेष म्हणजे चतुर्थश्रेणीतील कर्मचाऱ्यांना अधिकाऱ्यांसमवेत एकाच व्यासपीठावर आणून त्यांच्या प्रदीर्घ सेवेची दखल घेवून त्यांचा सन्मान करणे ही अभिमानास्पद बाब आहे. तसेच, या सेवकांच्या सेवानिवृत्तीच्या आर्थिक रकमा विहित मुदतीत देणेचा सुरु केलेला हा एक चांगला उपक्रम असल्याचे डॉ. परदेशी यांनी नमूद केले. तसेच, सेवानिवृत्त सेवकांना त्यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा त्यांनी दिल्या. या कार्यक्रमामध्ये सर्व सेवानिवृत्त सेवकांना स्मृतिचिन्ह, शॉल व गुलाबपुष्प देवून गौरविण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कामगार कल्याण अधिकारी श्री. अरुण खिलारी यांनी व आभार प्रदर्शन श्री. जयवंत शिंदे यांनी केले.

## पुणे महानगरपालिकेत जागतिक आरोग्य दिनाचे आयोजन

पुणे महानगरपालिका आरोग्य खात्यामार्फत दिनांक ७/४/२००९ रोजी जागतिक आरोग्य दिनाचे आयोजन करण्यात आले. सदर आरोग्य दिन कॅ. वडके सभागृह येथे सकाळी ११.०० ते १.३० वाजता मा.एम.एस.देवणीकर, अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) यांचे उपस्थितीत साजरा करण्यात आला. या वर्षीच्या आरोग्य दिनाचे घोषवाक्य SAVE LIVES MAKE HOSPITALS SAFE IN EMERGENCIES हे आहे.

मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) यांनी पुणे महापालिका दवाखान्यांतील परिचारिकांना मार्गदर्शन केले. डॉ. श्रोत्री, निवृत्त हेड ऑफ गायनेक डिपार्टमेंट, बी.जे. महाविद्यालय यांनी गरोदर महिला व बाळंतपणामध्ये उद्‌भवणाऱ्या EMERGENCIES कशा हाताळाव्यात व कोणती काळजी घ्यावी याबाबत मार्गदर्शन केले.

मा. डॉ. आर.आर.परदेशी यांनी डॉ. साबणे व डॉ. एस.टी.परदेशी यांच्या सहाय्याने सदर कार्यक्रमाचे आयोजन केले.

## धनकवडी क्षेत्रीय कार्यालयांतर्गत स्वच्छता व जनजागृती मोहिम

धनकवडी क्षेत्रीय कार्यालयातील वॉर्ड क्र. १४४, आगम मंदीर येथे संत गाडगेबाबत नागरी स्वच्छता अभियानांतर्गत स्वच्छता व जनजागृती मोहिम राबविण्यात आली. त्यानिमित्त प्रभात फेरी काढण्यात आली. सदर प्रभात फेरीत वॉर्ड क्र. १४१ व १४४ मधील सर्व सफाई सेवकांनी वॉर्डातील अंतर्गत रस्ते व नागरिकांनी कचरा टाकून अस्वच्छ केलेले मोकळे प्लॉट्स यांची साफसफाई केली.

प्रभात फेरीची सुरुवात संतोषनगर भाजी मार्केट चौकापासून करण्यात आली. संतोषनगर भागातील महात्मा फुले विद्यानिकेतनचे गगनगिरी प्राथमिक विद्यालयाच्या इयत्ता पाचवी ते सातवीच्या सुमारे दोनशे विद्यार्थी व त्यांचे शिक्षक यांनी भाग घेतला. विद्यार्थ्यांनी वॉर्डातील नागरिकांच्या घरी जावून पत्रके वाटली. काही विद्यार्थी स्वच्छ पुणे सुंदर पुणे, ओला व सुका कचरा वेगळा द्यावा या घोषणा देत व हातात स्वच्छतेविषयी फलक घेवून मोठ्या उत्साहात प्रभात फेरीमध्ये सामील झाले होते. विद्यार्थी व नागरिक यांच्यात स्वच्छतेविषयी जनजागृती व्हावी या उद्देशाने पुणे मनपा कामगारांचे श्रमिक कला पथकाच्या कलाकारांनी प्रभात फेरीमध्ये सहभाग घेतला. जागोजागी नागरिकांना ओल्या सुक्या कचऱ्याबाबत प्रबोधन व्हावे म्हणून पथनाट्य सादर केले. स्वच्छतेवर आधारित विविध गाणी गावून वॉर्डातील नागरिकांना स्वच्छतेबाबत मार्गदर्शन करुन मनपाची कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची सध्याची परिस्थिती व भविष्यात कचऱ्यामुळे निर्माण होणाऱ्या अडचणी याबाबत दक्ष रहाण्याचे व नागरिकांचे हक्क व कर्तव्य यांची जाणीव करुन दिली. प्रभात फेरीतील शालेय विद्यार्थी व कला पथक यांचा उत्साह बघून वॉर्डातील समाजसेवक, बचत गटातील महिला व नागरिक मोठ्या संख्येने फेरीमध्ये सामील झाले. तसेच, ओला व सुका कचरा वेगवेगळा करुन देण्याचे व आपला परिसर स्वच्छ ठेवण्याचे त्यांनी आश्वासन दिले.



सदर प्रभात फेरीसाठी धनकवडी क्षेत्रीय कार्यालयाचे क्षेत्रीय अधिकारी मा. उमेश माळी, क्षेत्रीय वैद्यकीय अधिकारी डॉ.केतकी घाटगे, विभागीय आरोग्य निरीक्षक श्री. मधुकर घोलप व सर्व आरोग्य निरीक्षक यांनी मार्गदर्शन केले. प्रभात फेरीचा समारोप दत्तनगर आरोग्य कोठी येथे करण्यात आला. विभागीय आरोग्य निरीक्षक यांनी सर्वांचे आभार प्रदर्शन केले व स्वच्छतेबाबत असेच सहकार्य करावे असे वॉर्डातील महिला बचत गटांना आवाहन करुन कार्यक्रमाचा समारोप केला.

## पुणे महानगरपालिकेत अग्निशमन सेवा सप्ताह साजरा

पुणे मनपा अग्निशामक दलाचे वतीने दिनांक १४ ते २० एप्रिल, २००९ या कालावधीत अग्निशमन सेवा सप्ताहाच्या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. दि.१४/४/०९ रोजी अग्निशमन सेवा दिनाप्रित्यर्थ एरंडवणे येथील अग्निशमन केंद्रामधील शौर्य स्तंभाला मा. लक्ष्मीकांत कोंढरे, उपायुक्त (ज) तथा मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी पुष्पचक्र अर्पण करुन अभिवादन केले. अग्निशमन दलात सेवा करीत असताना विविध घटनांमध्ये बलिदान दिलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. भवानीपेठ येथील मुख्य अग्निशमन दल कार्यालयात अग्निशमन दलाचा ध्वज अर्ध्यावर उतरवून सलामी देवून बलिदान दिलेल्या सेवक/अधिकाऱ्यांना सर्व उपस्थितांनी श्रध्दांजली अर्पण केली. या प्रसंगी मा. लक्ष्मीकांत कोंढरे, श्री. प्रशांत रणपिसे, सहाय्यक विभागीय अधिकारी, श्री. सुनिल तानाजी गिलबिले, स्टेशन ड्युटी ऑफिसर, श्री. राजेश जगताप, रेडिओ टेक्निशियन, श्री.वासुदेव एकबोटे, श्री. प्रभाकर उम्राटकर, तसेच अग्निशमन दलातील अन्य जवान, कर्मचारी, अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



दि.१५/४/०९ रोजी पुणे शहरातील चित्रपट/नाट्य गृहामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये अग्नि सुरक्षेबाबत माहितीपर व्याख्याने, प्रात्यक्षिके व आग प्रतिबंधक उपाययोजनांचे प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आले. अग्निशमन दलाकडून आग, भूकंप, पूर अशा आपत्तीचे प्रसंगी वापरण्यात येणाऱ्या साहित्याची शहरातील नागरिकांना माहिती होण्याचे दृष्टीने सदर साहित्याचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले.

दिनांक १९/४/२००९ रोजी पुणे शहरामधील पेट्रोल पंपावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये अग्नि सुरक्षेबाबत जागृती होणेकामी माहितीपर व्याख्याने, प्रात्यक्षिके व आग प्रतिबंधक उपाय योजनांचे प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

## बालगंधर्व रंगमंदीर येथे रिहर्सल हॉल

पुणे मनपाच्या बालगंधर्व रंगमंदीर येथे तळघरातील ३०० चौ.फुटाची खोली बरेच दिवस अडगळीचे सामान ठेवून बंदिस्त होती. सदर खोली नाटकाच्या तालमी करण्यासाठी उपलब्ध करुन दिल्यास या जागेचा सदुपयोग होईल, असे लक्षात आल्याने प्रशासन, नाट्य क्षेत्रातील कलाकार व मान्यवर यांच्या सहकार्याने सदर जागेचा रंगीत तालमीसाठी करण्याचा निर्णय घेण्यात आला. नाट्य व्यवस्थापक श्री. प्रदीप कांबळे, श्री.कोठावळे, श्री. समीर हम्पी, श्री. नरेंद्र मोहिते, श्री. मेघराज भोसले, श्री प्रवीण बर्वे यांनी सदर खोलीची दुरुस्ती व रंगकाम करुन घेतले. त्यामुळे सदर जागेचे रुपांतर रंगीत तालीम दालनात झाले. सदर दालनाचे उद्घाटन ज्येष्ठ साहित्यिक श्री. सतीश आळेकर व ज्येष्ठ चित्रपट कलावंत श्री. प्रशांत दामले यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. या वेळी श्री. आळेकर यांनी बालगंधर्व रंगमंदीरातच रंगीत तालीम दालन चालू केल्याने व्यवस्थापन व पुणे मनपाची प्रशंसना केली. श्री. प्रशांत दामले यांनी या हॉलचा उपयोग आमच्या सारख्या मुंबईतील नाट्य कलावंतांना पुण्यात प्रयोग करताना नक्कीच होईल, असे सांगून स्वत:च्या नवीन नाट्य प्रयोगाच्या प्रॅक्टीससाठी सदर हॉलचा उपयोग करुन घेतला.



सध्या सदर दालन रोज आरक्षित असून सर्व भाषिक कलावंत या दालनाचा रंगीत तालमीसाठी उपयोग करीत आहेत. दालनाचे भाडे प्रतिदिनी रु. ४००/- आकारण्यात येते. रंगीत तालीम सुरु केल्यानंतर श्री. अरुण नलावडे, सौ. भाग्यश्री देसाई, श्रीमती लीला गांधी, श्रीमती प्रतिभा मोडक यासारख्या नाट्य क्षेत्रातील अनेक कलावंतांनी या दालनाची पाहणी करुन समाधान व्यक्त केले.

या दालनाचे नुतनीकरण व मनपाच्या जागेचा पूरक व योग्य उपयोग करुन घेण्यात श्री. अमर परदेशी व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे बहुमोल योगदान आहे. त्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन.

## पुणे मनपामध्ये महिलांसाठी व्यक्तिमत्व विकास शिबीराचे आयोजन

केंद्रीय कामगार शिक्षण मंडळाच्या वतीने शासकीय, निमशासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थांतील अधिकारी/सेवकांसाठी विविध प्रकारचे प्रशिक्षण आयोजित करण्यात येते.

या प्रशिक्षण योजनेचा एक भाग म्हणून दिनांक १८ मे ते ७ जून, २००९ या कालावधीत महिलांसाठी व्यक्तिमत्व विकास या विषयावर शिबीर आयोजित करण्यात आले आहे. या शिबीरामध्ये राष्ट्रीय आर्थिक परिस्थिती, औद्योगिक संबंध, नेतृत्व शैली, उत्पादकता, शिक्षण, व्यक्तिमत्व विकास, व्यवस्थापकीय सहभाग, कामगार संघटना, महत्वाचे कामगार कायदे व त्यामधील तरतुदी, पुरविण्यात येणाऱ्या सेवांचा दर्जा, इत्यादी बाबींच्या अनुषंगाने केंद्रीय कामगार शिक्षण मंडळाकडील तज्ञ व अनुभवी प्रशिक्षक मार्गदर्शन करणार आहेत. संस्थेमधील कर्मचाऱ्यांच्या कामाचा दर्जा वाढविणे, सकारात्मक दृष्टिकोन आणि वातारण निर्माण करणे, संस्थेचे उद्दिष्ट साध्य करणे ही बाब सद्यस्थितीत अतिशय महत्वाची आहे. या अनुषंगाने वरील प्रशिक्षणाचा निश्चितपणे चांगला परिणाम होवून कर्मचाऱ्यांमधील सकारात्मकता व कार्यक्षमता वाढीस लागणार आहे.

हे शिबीर महापालिका भवन किंवा कामगार प्रशिक्षण हॉल, कसबा पेठ येथे होणार असून, ३ आठवडे पूर्ण वेळ आहे. तसेच, या शिबीरामध्ये ३० प्रशिक्षणार्थींची निवड करण्यात येणार आहे. तरी, इच्छुक महिला सेवकांनी या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा.

## आय.टी.फॉर स्कुल कार्यशाळेचे आयोजन

पुणे महानगरपालिका माध्यमिक व तांत्रिक शिक्षण कार्यालय आणि शिक्षण मंडळ, पुणे महानगपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २८/३/२००९ रोजी सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत मौलाना अबुल कलाम आझाद सांस्कृतिक केंद्र, कोरेगाव पार्क, पुणे येथे आय.टी.फॉर स्कुल या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यशाळेचे उद्घाटन मा. प्रकाश परब, शिक्षणाधिकारी, माध्यमिक शिक्षण, पुणे जिल्हा परिषद, पुणे यांचे हस्ते सकाळी ११.०० वाजता करण्यात आले. सदर कार्यशाळेस मा.एम.एस.देवणीकर, अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

पद्मश्री डॉ. विजय भटकर (जेष्ठ संगणक तज्ञ) अध्यक्ष, ई.टी.एच. रिसर्च लॅब, पुणे यांनी पुणे महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांकडील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शालेय कार्यात संगणकाचा प्रभावी वापर करण्याबाबत बहुमोल मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे संयोजन मा. सुधाकर तांबे, शिक्षणाधिकारी, माध्यमिक व तांत्रिक शिक्षण, पुणे महानगरपालिका यांनी केले.

## कर्वेरोड क्षेत्रीय कार्यालयाकडील कामगारांची आरोग्य तपासणी

कर्वेरोड क्षेत्रीय कार्यालय व पुणे शहर आणि जिल्हा वैद्यकीय व्यावसायिक संघटना (दक्षिण) पुणे यांचे संयुक्त विद्यमाने दिनांक २९/४/२००९ रोजी कै. सुतार दवाखाना, कोथरुड येथे कर्वेरोड क्षेत्रीय कार्यालयाकडील सेवकांसाठी दु.२ ते ५ कालावधीत आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबीरामध्ये क्षेत्रीय कार्यालयाच्या आरोग्य विभागाकडे २०० सेवकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. या तपासणीमध्ये आढळून आलेल्या आजारानुसार पुढील औषधोपचाराबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या शिबीरामध्ये पुणे शहर आणि जिल्हा वैद्यकीय व्यावसायिक संघटना (दक्षिण) पुणे संघटनेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र जगताप, सचिव डॉ.विजय वराड व संघटनेचे २५ वैद्यकीय व्यावसायिक यांनी तपासण्या केल्या. या शिबीराच्या आयोजनासाठी कर्वेरोड क्षेत्रीय कार्यालयाचे क्षेत्रीय अधिकारी श्री. नितीन उदास यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच, क्षेत्रीय वैद्यकीय अधिकारी डॉ.एस.एस.आखाडे यांच्यासह या शिबीर कालावधीत संपूर्ण वेळ उपस्थित राहून शिबीर यशस्वीपणे आयोजित केले. या शिबीराच्या आयोजनामध्ये विभागीय आरोग्य निरीक्षक श्री. चंद्रकांत भोसले व त्यांचे सहकारी सर्वश्री बाळकृष्ण कुंभार, अविनाश तेलकर, मधुकर पाटील व आरोग्य कोठीतील सर्व मोकादम सेवकांनी महत्वाची भूमिका पार पाडली.



## महत्वाच्या सूचना

- सन २००८-०९ या आर्थिक वर्षातील सर्व अधिकारी/सेवकांचे गोपनीय अहवाल संबंधित अधिकाऱ्याकडून प्रतिवेदन व पुनर्विलोकन करुन अद्ययावत करावेत.
- सन २००८-०९ या वर्षात विविध विभागांनी केलेल्या कामगिरीचा वार्षिक वृत्तांत मुख्य लेखापाल कार्यालयाकडे न चुकता पाठवावेत.
- एप्रिल पेड इन मे, २००९ या महिन्याच्या मासिक वेतनातून कामगार कल्याण निधीची सभासद वर्गणी रु. १००/- कपात केली असल्याची खात्री करा.
- अनुपस्थिती वा अन्य कारणाने या महिन्यामध्ये वेतन न घेतलेल्या कर्मचाऱ्यांची कामगार कल्याण निधीची वार्षिक वर्गणी पुढील किंवा वेतन निघालेल्या महिन्यामध्ये न चुकता कपात करावी.
- असाधारण किंवा रुग्णालयीन रजेवर असणाऱ्या कर्मचाऱ्यांची कामगार कल्याण निधीची वार्षिक वर्गणी त्यांच्या देय वेतनामधून न चुकता करावी.
- सफाई कर्मचारी सेवानिवृत्त, शारिरीकदृष्ट्या अपात्र वा मृत झाल्यास मा. लाड कमिटीच्या शिफारशी आणि त्या अनुषंगाने मे. राज्य शासनाच्या विहित मार्गदर्शक तत्वांनुसार वारस नियुक्ती प्रकरण मान्यतेसाठी सत्वर सादर करा.
- महापालिका सेवेत असताना मृत झालेल्या सेवकांच्या वारसांना कामगार कल्याण निधी व महापालिका निधीतून अनुज्ञेय आर्थिक लाभ मिळणेकामी प्रकरण व कागदपत्रे सत्वर सादर करावीत.
- महापालिका सेवेतून सेवानिवृत्त होणाऱ्या सर्व सेवकांना सेवानिवृत्ती वेतन व तदनुषंगिक अनुज्ञेय आर्थिक लाभ विहित मुदतीत आदा करण्याची दक्षता घ्यावी.


**कल्याणवार्ता**
एप्रिल, २००९
❖ प्रकाशक तथा अध्यक्ष ❖
कामगार कल्याण निधी
मा. प्रवीणसिंह परदेशी
आयुक्त, पुणे महापालिका
❖ संपादक ❖
मा. नंदकिशोर जगताप
सल्लागार (कामगार)
❖ कार्यकारी संपादक ❖
शिवाजी दौंडकर
कामगार कल्याण अधिकारी
❖ सहाय्यक ❖
सौ. ज्योती अ.भोसले
❖ मुद्रक ❖
जयंत पवार
व्यवस्थापक,
मुद्रणमहर्षि मामाराव दाते
मुद्रणालय, मनपा, पुणे.
❖ प्रकाशन स्थळ ❖
पुणे महापालिका
शिवाजीनगर, पुणे ४११ ००५


या अंकात प्रसिध्द झालेल्या मतांशी प्रकाशक, संपादक, कार्यकारी संपादक व पुणे महापालिका सहमत असतीलच असे नाही.


❖ संपर्क ❖
सल्लागार (कामगार) कार्यालय,
पुणे महानगरपालिका.
दूरध्वनी क्र. २५५० १२५५/ १२५२/१२५३
ईमेल आयडी
nandkumar.jagtap @punecorporation.org